जावक क्र - 7242/२०२३
पर्वती पोलीस स्टेशन, पुणे शहर
दिनांक– २२/१०/२०२३

प्रति,

मा. जन संपर्क अधिकारी सो,
पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

यांना सविनय सादर

प्रतिवेदक - एस.ए.मुळीक,पोलीस उप निरिक्षक, पर्वती पोलीस स्टेशन पुणे शहर.

विषय :- वर्तमानपत्र प्रसिद्धी होणे बाबत..

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, पर्वती पोलीस ठाणे अ.मयत रजि.नं. १३६/२०२३ मधील रिपोर्टर - ए.एच दिघे पोलीस हवालदार ७६९३ यांनी रिपोर्ट दिल्यात मजकुर की, आज रोजी आम्हास पर्वती दर्शन पोलीस चौकी रात्रपाळी डयुटीस हजर असताना आम्हास खबर देणार ठाणे अंमलदार पर्वती पोलीस ठाणे, पुणे शहर यांना खबर देणार पो.ना. ३०५९ चव्हाण ससुन ओ.पी.डी. यांना खबर देणार जमादार हारगुडे ससुन हॉस्पीटल पुणे यांनी समक्ष कागदपत्रांसह येवुन कळविले की, पेशंटनामे अनोळखी पुरूष वय- अंदाजे ६० वर्षे, रा. पत्ता- माहीत नाही यांना डॉ. गणेश तोडकरी १०८ नंबर ॲम्बुलंस मोबा. नं.-७७७४०८६०१० यांनी भापकर पेट्रोलपंप शेजारी पुणे सातारा रोड, पुणे या ठिकाणी फिट आल्याने पेशंट यांना उपचारकामी ससुन हॉस्पीटल पुणे येथे दि.१९/१०/२०२३ रोजी सकाळी ११/५० वा. वॉर्ड क्र. १५ मध्ये ॲडमिट केले होते. वॉर्ड क्र. १५ ससुन हॉस्पीटल पुणे येथे त्यांचेवर उपचार चालु असताना उपचारादरम्यान दि.२१/१०/२०२३ रोजी दुपारी ०१/०० वा. मयत घोषीत केले. त्यांचा एम.एल.सी.नं.- २६२६०/२३ असा आहे.

तसेच सदर मयत इसमाचे कोणतेही नातेवाईक सदरवेळी उपस्थीत झाले नसल्याने त्यांचा शोध होणे कामी सदर मयत बॉडी तीन दिवस शवागृहात ठेवण्यात आली आहे. सदर अनोळखी इसमाचे वर्णन खालील प्रमाणे..



नाव – एक अनोळखी इसम वय- अंदाजे ६० वर्षे, रंग- गोरा, डोक्याचे केस बारिक काळे पांढरे, दाढीचे केस काळे-पांढरे व वाढलेले, ऊंची अंदाजे- ५.२ इंच, बांधा- सडपातळ, जवळ मौल्यवान चिज वस्तू नाही.

तरी वरील वर्णनाच्या अनोळखी मयत इसमाच्या नातेवाईकांचा शोध होणे कामी वर्तमानपत्र प्रसिद्धी होणेस विनंती आहे.

**सोबत**:- सदर अनोळखी मयत इसमाचा फोटो जोडला आहे.

मा. सादर व्हावे
दि. २२/१०/२०२३

पोलीस उप निरिक्षक
पर्वती पोलीस ठाणे,पुणे शहर

मार्फतीने,
मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो,
पर्वती पोलीस ठाणे पुणे शहर